Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)


## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे :

### प्रकरण ५३ :

# नवजात बाळामधील कावीळ


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर

अनुवादक : डॉ. नरेंद्र नानीवडेकर

पुनरावलोकन : डॉ. जयंत पांढरीकर

श्रीमती उज्ज्वल करमळकर

*Convener:* **Sushma Nangia**

*Members:* **Anjali Kulkarni, Ashok Kumar, Ruchi N Nanavati**

*Reviewer:* **Sudip Dutta**




जन्मजात बाळाला कावीळ झाल्यावर पालक विनाकारण घाबरुन जातात. ही कावीळ यकृताच्या आजाराची नसून शरीरात घडत असलेल्या बदलांमुळे असते आणि बहुतांश वेळा काही उपाय न करता ती पूर्णपणे बरी होत असते. आजच्या प्रकरणात यावर आपण चर्चा करणार आहोत.

## लहान मुलांच्या कावीळ या आजारा संदर्भात वारंवार विचारले जाणारे १० प्रश्न

प्र.१ माझ्या बाळाला जन्मानंतर इतक्या लवकर कावीळ का झाली? ही कावीळ माझ्या बाळाला काही इजा तर करणार नाही ना? ही कावीळ केव्हा जाईल?

प्र.२ कावीळ म्हणजे कमकुवत झालेले किंवा इजा झालेले यकृत का? भविष्यात ही कावीळ माझ्या मुलाला व मुलांना पुन्हा होईल का?

प्र.३ ही कावीळ संसर्गजन्य आहे का? आमच्या घरात इतर मुले आहेत, त्यांनाही माझ्या बाळापासून ही कावीळ होईल का?

प्र.४ फोटोथेरपी म्हणजे काय? त्याच्यामुळे माझ्या बाळाला इजा होईल का?

प्र.५ माझ्या पहिल्या बाळाला तीन ते चार दिवस फोटोथेरपी देण्यात आली. दुसऱ्या बाळाला सुद्धा त्याची गरज पडेल का?

प्र.६ फोटोथेरपी देत असताना बाळाची काय काळजी घ्यावी? त्याचा बाळाला त्रास होईल का?

प्र.७ माझ्या बाळंतपणात मी घेतलेल्या आहारामुळे किंवा स्तनपानामुळे माझ्या बाळाला कावीळ झाली का? त्याचा पपई किंवा हळदीशी काही संबंध आहे का? कावीळ असताना माझ्या बाळाला मी स्तनपान द्यावे की नाही?

प्र.८ कावीळ घालवण्यासाठी मी बाळाला कशी मदत करावी? त्याला साखरपाणी किंवा इतर काही पदार्थ कावीळ कमी करण्यासाठी द्यावे का?

प्र.९ एखादी अशी चाचणी आहे का की ज्यामुळे बाळाच्या कावीळीचे प्रमाण मला समजू शकेल? टी सी बी तपासणी काय आहे?

प्र.१० फोटो थेरपी दिल्यामुळे बाळाचा उजळपणा कमी होईल का? आणि बाळाला सूर्यप्रकाश दिल्याने बाळाला फायदा होईल का?


Under the Auspices of the IAP Action Plan 20202021

Piyush Gupta — IAP President 2021

Remesh Kumar R — IAP President-Elect 2021

Bakul Parekh — IAP President 2020

GV Basavaraja — IAP HSG 20202021

Deepak Ugra — National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# नवजात बाळामधील कावीळ

## प्र. १

### माझ्या बाळाला जन्मानंतर इतक्या लवकर कावीळ का झाली? ही कावीळ माझ्या बाळाला काही इजा तर करणार नाही ना? ही कावीळ केव्हा जाईल?

जन्मानंतर काही दिवसातच तुमच्या बाळाला कावीळ होण्याचे कारण म्हणजे शरीरामध्ये "बिलीरुबीन" नावाचे पिवळे रंग कण जमा झालेले असतात. यामुळे बाळाच्या त्वचेला पिवळा रंग येतो. हे संयुग प्रत्येकाच्या शरीरात तयार होत असते. (त्यात बाळेही आलीच) जुन्या झालेल्या तांबड्या पेशी नष्ट होतात आणि त्यातून त्या यकृतामध्ये प्रक्रिया केल्या जातात. त्यातून हे संयुग तयार होते. जन्मा अगोदर या बिलीरुबीनची काळजी बाळाच्या आईचे शरीर घेत असते आणि म्हणून जन्माच्या वेळी हे बाळ पिवळे दिसत नाही. जन्मानंतर बाळाचे यकृत पुरेसे सक्षम होण्यासाठी थोडा वेळ घेते आणि या रंग कणाला बाहेर टाकण्याचे काम हळूहळू करु लागते. त्यामुळे पहिल्या काही दिवसातच मुले पिवळी दिसण्याचं प्रमाण अगदी सर्वसाधारणपणे दिसते. जवळजवळ ८०% मुलांमध्ये थोड्याफार प्रमाणात कावीळ होतच असते.

सर्वसाधारणपणे ही कावीळ मुलाला कुठल्याही प्रकारची इजा करत नाही. पुरेसे वजन आणि पूर्ण दिवस भरलेल्या बाळांना या कावीळीसाठी कोणत्याही प्रकारचे उपचार लागत नाहीत आणि आठवड्याभरात ही कावीळ निघून जाते. मात्र जर बाळ अपुऱ्या दिवसांचे असेल किंवा त्याला काही आजार असला तर आपल्याला थोडी जास्त काळजी जन्माच्या पहिल्या दिवशीच झाली किंवा जी दुसऱ्या आठवड्यानंतर कावीळ अजून गेली नाही आणि त्याच्यामुळे बाळाचे हात तळवे आणि पाय पिवळे दिसत असतील तर ती कावीळ जास्त आहे आणि ते निश्चित काळजीचे कारण आहे. तसेच जर आईचा व बाळाचा रक्तगट एक नसेल आणि अशा बाळाला कावीळ झाली तर त्या बाळाला इजा होण्याची शक्यता असते. त्याला त्यापासून वाचवण्यासाठी ताबडतोब वैद्यकीय सल्ला घेणे गरजेचे आहे.



(आकृती १ : खुप जास्त गंभीर कावीळ झालेल्या बाळाचे शरीर पूर्ण पिवळे दिसते. इथे खुप उशीर झालेला आहे, बाळ या टप्प्यापर्यंत जाता कामा नये.)

बहुतेक बाळांना दुसऱ्या आठवड्यापासून कावीळ कमी होत जाताना दिसते कारण बाळाचे शरीर बिलीरुबीनला बाहेर टाकण्याचे काम व्यवस्थित करु लागते. काही बाळं एक महिन्यापर्यंत थोडीफार पिवळसर दिसू शकतात. तरीही ते सर्वसामान्य धरायला हरकत नाही. पण अशा बाळाने डॉक्टरी सल्ला घेणे गरजेचे आहे. वरचेवर स्तनपान केल्यामुळे कावीळीचे प्रमाण कमी करण्यामध्ये मदत होत असते.

प्र. २

## कावीळ म्हणजे कमकुवत झालेले किंवा इजा झालेले यकृत का? भविष्यात ही कावीळ माझ्या मुलाला व मुलांना पुन्हा होईल का?

नाही, मोठ्या माणसांमध्ये कावीळ हे यकृताच्या आजाराचे लक्षण असले तरी असे लहान बाळांमध्ये क्वचितच होत असते. कावीळीचा प्रादुर्भाव याचा अर्थ तांबड्यापेशी नाश पावत आहेत त्यातून बाळाचे शरीर बिलिरुबीन तयार करत आहे. ८०-८५ टक्के मुलांमध्ये दिसणारी ही पूर्णपणे सर्वसामान्य घटना आहे. मात्र दोन आठवड्याच्या पलीकडे कावीळ राहिल्यास ते सर्वसामान्य ठरत नाही आणि अशावेळी तुम्ही यामागे आणखी काही कारणे तर नाही ना हे जाणून घेण्यासाठी वैद्यकीय सल्ला घ्यावा. तुमचे डॉक्टर बाळाला तपासणी करुन योग्य ते कारण शोधण्याच्या प्रयत्न करतील.

कावीळ ही सर्वसामान्य घटना असून ती अनेक बाळांमध्ये होत असते. ह्या बाळात कावीळ दिसल्यामुळे पुढच्या बाळामध्ये अशी कावीळ होईल असा धोका वाटत नाही. पण काही परिस्थितीमध्ये उदा. आई व बाळाचे रक्तगट वेगवेगळे असल्याने आणि काही जनुकीय दोषांमुळे पुढच्या बाळांमध्येही कावीळ होऊ शकते.

## प्र. ३

## ही कावीळ संसर्गजन्य आहे का? आमच्या घरात इतर मुले आहेत, त्यांनाही माझ्या बाळापासून ही कावीळ होईल का?

नाही. ही कावीळ संसर्गजन्य नसते. कावीळ ही अपेक्षित नैसर्गिकबाब आहे आणि त्याला बरेचदा कुठल्याही प्रकारच्या उपचारांची गरज नाही. तुम्हाला माहित असेलच की बाळाचा पिवळा रंग बिलिरुबीन या द्रव्यांमुळे असतो. हे द्रव्य शरीरात साठल्यामुळे यकृताला ते व्यवस्थितपणे हाताळता येत नाही आणि जसजशी यकृताची कार्यक्षमता वाढून ते चांगले काम करु लागते तसतशी कावीळीची ही पातळी कमी व्हायला सुरुवात होते. हे त्वचेच्या खाली इतरही अनेक रंग कण साठत असतात. त्यामुळे हा एक खास पिवळा रंग त्याला दिसून येतो. आपल्या डोळ्यांमध्ये व त्वचेला दिसणारा पिवळा रंग तुम्हाला काळजीत पाडू शकतो. कारण तुम्ही पूर्वी हे पाहिलेले नसते. मात्र इथे एक लक्षात घेणे गरजेचे आहे की हे पूर्णपणे निर्धोक आहे आणि कुठल्याही दुसऱ्या व्यक्तीने बाळाला स्पर्श केल्यास त्याला ते संसर्गजन्य नाही. तुम्ही बाळाला स्तनपान देत राहावे. त्या बाळाची अजिबात काळजी करायचे कारण नाही आणि इतर बाळांना सुद्धा हा आजार संसर्गित होणार नाही.

## प्र.४

## फोटोथेरपी म्हणजे काय? त्याच्यामुळे माझ्या बाळाला इजा होईल का?

फोटोथेरपी ही एक बाळाला कावीळीसाठी देण्याची उपचार पद्धती आहे. त्वचेला आणि डोळ्याला दिसणारा पिवळा रंग बिलीरुबीनचे प्रमाण बाळाच्या रक्तात वाढल्यामुळे येतो. फोटोथेरपी हा एक तेजस्वी निळा प्रकाश असून त्यामुळे बिलीरुबीनचे प्रमाण कमी होते आणि शरीरातून लघवी आणि संडास द्वारे उत्सर्जन करण्याची क्रिया वाढते. ही एक कावीळीसाठीची जगमान्य उपचार पद्धती आहे. आपल्याला दोन पद्धतीचे फोटोथेरपी युनिट्स पाहायला मिळतात.

१) एक सर्वसाधारण फोटोथेरपी ज्यात हॅलोजनचे दिवे किंवा स्फुरदीप्ती दिवे वापरले आहेत.

२) फायबर ऑप्टिक फोटोथेरपी युनिट "बिलीब्लांकेट" जे बाळाच्या पाठीखाली ठेवले जाते.



हा प्रकाश आपल्याला बाळाच्या त्वचेला द्यावा लागतो. हा उपचार शक्यतोवर इस्पितळातच करावा. तुमच्या बाळाचे सर्व कपडे काढावे लागतात आणि डोळे व जननेंद्रिय झाकून त्याचा तेजस्वी प्रकाश बाळाच्या अंगावर दिला जातो.

या उपचाराच्या दरम्यान आम्ही तुमच्या बाळाच्या बिलीरुबीनचे प्रमाण वरचेवर पाहत राहतो आणि एकदा त्याची पातळी धोक्याच्या पातळीच्या खाली आली की हा उपचार थांबवला जातो. याला शक्यतो ४८ ते ७२ तास लागतात. जर बिलीरुबीनचे प्रमाण खूप जास्त असेल तर त्याला काही उपचार करावे लागतात आणि तुमचे डॉक्टर तुम्हाला वेळोवेळी त्याबद्दल खुलासा करतीलच.

फोटोथेरपी अतिशय निर्धोक आहे आणि त्यांनी बाळाला कुठल्याही प्रकारचा त्रास किंवा इजा होत नाही.

(आकृती २ : अतिशय सुखद अवस्थेमध्ये निळ्या लाईट खाली ठेवलेले बाळ ज्याचे डोळे आणि जननेंद्रीय झाकलेले आहेत.)

## प्र. ५

### माझ्या पहिल्या बाळाला तीन ते चार दिवस फोटोथेरपी देण्यात आली. दुसऱ्या बाळाला सुद्धा त्याची गरज पडेल का?

कावीळीचे कारण आणि पातळी यावर फोटोथेरपी किती दिवस द्यावी लागेल हे ठरवले जाते. बाळाला कावीळ झाली असताना आम्ही बाळाच्या काही तपासण्या करतो आणि त्याची कावीळ उपचार करण्याइतपत जास्त आहे का हे ठरवतो. जर तुमचे बाळ छान असेल आणि त्याला बाकी कावीळीची इतर कुठलीही लक्षणे नसतील तर त्या बाळाला कुठल्याही प्रकारच्या उपचारांची किंवा तपासणीची गरज पडणार नाही. फक्त बाळाला कावीळ असेल आणि बिलीरुबीन एका विशिष्ट पातळीच्यावर असेल तर त्या बाळाला फोटोथेरपी गरज पडेल. बरेचदा अनेक लहान बाळांमध्ये असलेल्या कावीळी या आपोआप कमी होणाऱ्या असतात आणि त्याला उपचाराची गरज नसते. अतिशय दुर्मिळ केस मध्ये आई व बाळाचे रक्तगट वेगवेगळे असतील किंवा काही दुर्मिळ जनुकीय दोषांमुळे हा कावीळ पुढच्या बाळामध्ये येऊ शकतो आणि त्याला फोटोथेरपी लागू शकते.

## प्र. ६

### फोटोथेरपी देत असताना बाळाची काय काळजी घ्यावी? त्याचा बाळाला त्रास होईल का?



आकृती ३ : फोटोथेरपी चालू असताना बाळाला स्तनपान दिले जाते आणि त्याची आहाराची व शरीरातील जलपातळीची काळजी घेतली जाते.

बाळाला वेगळ्या कॉटवर दिव्याखाली ठेवले जाते. आम्हा त्याचे डोळे पट्टीने झाकतो. आम्ही ही फोटो थेरपी दर २ ते ३ तासांनी २० ते ३० मिनिटांसाठी थांबवतो. त्यावेळी बाळ स्तनपान करु शकते आणि आपण त्यांचे लंगोट बदलू शकतो. बाळाचे तापमान वेळोवेळी पाहणे अत्यंत महत्वाचे आहे बाळाचे तापमान खूप जास्त किंवा खूप कमी होत नाही ना, हे पाहिले जाते. ज्या बाळाचे वजन खूप कमी असते अशा बाळांना इंक्युबेटरमध्ये फोटोथेरपी दिली जाते जेणेकरुन बाळाचे तापमान व्यवस्थित राखले जाते. सर्वसाधारणपणे फोटोथेरपी अत्यंत निर्धोक आहे. कधीकधी त्याच्यामुळे त्वचेवर चट्टे उठण्याची शक्यता असते मात्र उपचार थांबवल्यावर हे नाहीसे होतात. कधी कधी फोटोथेरपीमुळे तुमचे बाळ जास्त वेळा पातळ संडास करु शकते पण हा देखील तत्कालीक परिणाम असून त्यामुळे बाळाला कुठल्याही प्रकारची इजा होत नाही. आपल्याला एवढी खात्री करुन घ्यावी लागते की बाळाचे पोट व्यवस्थित भरलेले राहील आणि त्याच्या शरीरातल्या पाण्याची पातळी उपचारादरम्यान व्यवस्थित राहील.

## प्र.७

### माझ्या बाळंतपणात मी घेतलेल्या आहारामुळे किंवा स्तनपानामुळे माझ्या बाळाला कावीळ झाली का? त्याचा पपई किंवा हळदीशी काही संबंध आहे का? कावीळ असताना माझ्या बाळाला मी स्तनपान द्यावे की नाही?

बाळाच्या आईने गर्भारपणात किंवा स्तनपान करण्याच्या काळात घेतलेल्या आहाराशी बाळाच्या कावीळीचा काहीही संबंध नाही. आईने पुरेसा संतुलित आहार तिच्या गरोदरणात व स्तनपान करत असताना घेणे गरजेचे आहे. हळद किंवा पपई सारखे पदार्थ खाल्ल्यामुळे बाळाच्या कावीळीच्या दरम्यान स्तनपान देणे अत्यंत महत्वाचे आहे आणि खास करुन उपचार चालू असताना स्तनपान चालूच ठेवावे.

## प्र.८

### कावीळ घालवण्यासाठी मी बाळाला कशी मदत करावी? त्याला साखरपाणी किंवा इतर काही पदार्थ कावीळ कमी करण्यासाठी द्यावे का?

८५% बाळांमध्ये थोड्याफार प्रमाणात कावीळ असतेच, बरेचदा ही कावीळ आपोआप जात असते. एका आठवड्यात कावीळ कमी होते. तुम्ही फक्त बाळाला दूध पाजत राहणे गरजेचे आहे. हे दूध आपण दिवसभरातून ८ ते १० वेळा दिल्यास, सोबतच रात्री दिल्यास किंवा बाळाला भूक लागल्यावर केव्हाही दिल्यास आपले काम होत असते.

कुठल्याही प्रकारचे औषध साखर पाणी किंवा स्तनपाना व्यतिरिक्त दुसरा कुठलाही आहार बाळाला देण्याची गरज नाही. त्याने कावीळ कमी होत नाही आणि झालाच तर त्याच्यामुळे बाळाचा तोटा होतो,

## प्र.९

### एखादी अशी चाचणी आहे का की ज्यामुळे बाळाच्या कावीळीचे प्रमाण मला समजू शकेल? टी सी बी तपासणी काय आहे?

वेळीच कावीळीचे प्रमाण बघण्यासाठी सिरम बिलीरुबीन ही रक्तातली तपासणी केली जाते. त्यासाठी बाळाचे रक्त घेतले जाते. जेव्हा बाळ बऱ्यापैकी कावीळीमुळे पिवळे दिसते अशा वेळी ही तपासणी केली जाते आणि हे तुमचे डॉक्टर ठरवतील. बाळाच्या बाबतीत कुठलाही धोक्याचे लक्षण असले किंवा बाळाची रक्तातली बिलीरुबीनची पातळी काय आहे यावर पुढचे पाऊल उचलण्यात येईल. रक्ताचे नमुने घेण्यामध्ये थोडीशी वेदना होत असते यासाठी "टीसीबी" टेस्ट असते. टीसीबी याचा अर्थ "ट्रान्सक्यूट्यानियस विलीरोबिनोमेट्री" म्हणजे त्वचेच्या पलीकडील बिलीरुबीनचे प्रमाण पाहणे. ह्यात कुठल्याही प्रकारचे रक्त तपासायला घेतले जात नाही. या तपासणीमध्ये हातात धरलेल्या मशीनचे टोक म्हणजे "बिलीरुबीनो मीटर" हे बाळाच्या कपाळावर धरले जाते. त्यामुळे हे यंत्र बिलीरुबीनची अंदाजे पातळी दर्शवते. ही पातळी अगदी तंतोतंत नसते. खास करुन जेव्हा बिलीरुबीनचे प्रमाण जास्त असते किंवा बाळ अपुऱ्या दिवसाच असेल किंवा बाळ पहिल्या दिवशीच कावीळीने ग्रस्त आहे. त्यासाठी तुमचे डॉक्टर कदाचित रक्ताची तपासणी सांगतील आणि अशा बाळाचे बिलीरुबीन तपासायला पाठवून काविळचे प्रमाण ठरवतील.

## प्र.१०

### फोटोथेरपी दिल्यामुळे बाळाचा उजळपणा कमी होईल का? आणि बाळाला सूर्यप्रकाश दिल्याने बाळाला फायदा होईल का?

फोटोथेरपीमुळे कधी कधी त्वचेवर चट्टे येवू शकतात किंवा त्वचा पांढुरकी दिसू शकते पण हे फोटोथेरपी बंद केल्यावर पूर्णपणे नाहीसे होते आणि त्याच्यामुळे बाळाच्या उजळपणावर कोणताही परिणाम होत नाही. सूर्यप्रकाशाचा उपयोग कावीळीमध्ये होत नाही. कावीळीवर प्रकाशाचा एकमेव गुणकारी उपचार म्हणजे फोटोथेरपी आहे. आम्ही असं सुचवतो की तुम्हाला बाळ कावीळग्रस्त वाटत असेल तर तुम्ही तुममच्या डॉक्टरांशी बोलून कावीळ तपासून घ्यायला पाहिजे.